प्रसिध्दी पत्रक दिनांक : ०८/११/२०२४

**...दार यांचे रोजगार सेवकाचे मानधन बँक खात्यावर टाकण्यासाठी ग्रामसेवक गजानन मुतनेपाड व उपसरपंच संजय माझळकर यांनी २५,०००/- रू लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | पोस्टे हिमायतनगर जिल्हा नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं २६८/२०२४ कलम ७ भ्र.प्र.अ १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक ०७.११.२०२४ रोजी १८.२४ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १) गजानन शामराव मुतनेपाड, वय ३३ वर्षे, पद ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मौ. दुधवाळकेवाडी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड रा. अनुसयानगर, ता. भोकर जि. नांदेड<br>२) संजय शिवराम माझळकर, वय ३० वर्षे, व्यवसाय शेती, पद उपसरंपच, ग्रामपंचायत, मौ. दुधवाळकेवाडी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २५,०००/- ची मागणी |
| थोडक्यात माहिति | तक्रारदार हे त्यांचे रोजगार हमी योजनेअंतर्गत मौ. दुधळेवाडी/वाळकेवाडी, ता. हिमायतनगर अंतर्गत रोजगार सेवकाचे मानधन ३५,३८८/- रूपये मिळण्यासाठी ग्रामसेवक आलोसे गजानन मुतनेपाड यांना भेटले असता, त्यांनी उपसरपंच आलोसे माझळकर यांना भेटा असे सांगितले. त्यावरून तक्रारदार हे उपसरपंच आलोसे माझळकर यांना भेटले तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे रोजगार सेवकाचे मानधन त्यांचे बँक खात्यात टाकण्यासाठी सुरुवातीला २०,०००/- रूपयाची मागणी केली, त्यावेळी तक्रारदार यांनी नाईलाजास्तव होकार दिला. सदरचे २०,०००/- रुपये लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाल्याने व त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दिनांक १६/१०/२०२४ रोजी याबाबत तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कडून दिनांक २२/१०/२०२४ रोजी लाच मागणीची पडताळणी केली असता, लाच मागणी पडताळणी दरम्यान यातील आरोपी उपसरपंच आलोसे माझळकर यांनी सरपंच यांच्या नावाने स्वत:साठी १५,०००/- रूपये व ग्रामसेवक मुतनेपाड यांच्यासाठी १०,०००/- रूपये असे एकूण २५,०००/- रुपयाची पंचासमक्ष लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी उपसरंपच यांना ग्रामसेवक यांना बोलून खात्री करा असे म्हटले असता, उपसरपंच यांनी ग्रामसेवक यांना त्यांचे मोबाईलवर फोन लावून तक्रारदार यांच्या रोजगार सेवकाचे मानधन देण्यासाठी बोलणे केले असता आलोसे ग्रामसेवक मुतनेवाड यांनी स्वत:साठी १०,०००/- रूपये व आलोसे उपसरपंच संजय माझळकर यांनी सरपंच यांचे साठी १५,०००/- रूपये असे एकूण २५,०००/- रुपये लाच मागणी केली. म्हणुन पो.स्टे हिमायत नगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, डॉ. संजय तुंगार अपर पोलीस अधिक्षकलाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री. संदिप थडवे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :- 02462-253512<br>टोल फ्री कमांक- 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9545531234 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई-मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई-मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner